# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

## मा.स्थायी समिती

कार्यपत्रिका क्रमांक – ३२

**(सभावृत्तांत)**

दिनांक – २५/१०/२०१७ वेळ – दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा बुधवार, दिनांक २५/१०/२०१७ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.सावळे सिमा रविंद्र - सभापती
२) मा.ऊंडे लक्ष्मण धोंडू
३) मा.कुंदन अंबादास गायकवाड
४) मा.उत्तम प्रकाश केंदळे
५) मा.मुंढे उषा अंकुश
६) मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई
७) मा.कुटे निर्मला संजय
८) मा.कोमल दिपक मेवानी
९) मा.आशा धायगुडे-शेंडगे
१०) मा.गोफणे अनुराधा देविदास
११) मा.वैशाली जालिंदर काळभोर
१२) मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे

याशिवाय मा.दिलिप गावडे-आयुक्त,मा.बोदडे-प्र.नगरसचिव,मा.तळदेकर-मुख्यलेखापरिक्षक, मा.चव्हाण-शहर अभियंता, मा.डॉ.अनिल रॉय–आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.लांडे-मुख्यलेखापाल, मा.पाटील, मा.तुपे, मा.पठाण–सहशहर अभियंता, मा.डोईफोडे, मा.दुरगुडे, मा.कडूसकर, मा.लोणकर, मा.खोराटे,मा.खोत,मा.राऊत,मा.दांगट-सहाय्यक आयुक्त, मा.पवार-प्र.कायदा सल्लागार, मा.पाटील प्राचार्य,औद्योगिक प्रशिक्षण केंद्र,मा.आवारी-प्रशासन अधिकारी (शिक्षणमंडळ), मा.निकम, मा.सवणे, मा.तांबे,मा.थोरात,मा.लडकत,मा.खाबडे,मा.बरशेट्टी,मा.गलबले,मा.ओंभासे,मा.गट्टूवार,मा.पुजारी, मा.गायकवाड, मा.मोरे, मा.पाटील, मा.घुबे-कार्यकारी अभियंता, मा.डॉ.गोरे-पशुवैद्यकीय अधिकारी, मा.जरांडे-सुरक्षा अधिकारी,मा.ऐवले-समाज विकास अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-------------

**<u>उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करून घेणेत आले –</u>**

विषय क्रमांक १९) पिंपरी भाटनगर पुनर्वसन प्रकल्पातील इमारतीमधील बांधकाम दुरुस्तीबाबत व स्ट्रक्चरचे संरक्षणात्मक परीक्षण करणेबाबत...

विषय क्रमांक २०) भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा पिंपरी चौक येथील पुतळा परिसरात माता रमाईचा पुतळा उभारणे व स्थापत्य विषयक कामे करणे या कामासाठी वास्तुविशारदाची नेमणूक करणेबाबत-मा.उषा मुंढे, मा.अनुराधा गोफणे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक २१) ठ.क्र.१०७८ दि.२७/०९/२०१७ मध्ये दुरुस्ती करणेबाबत – मा.अनुराधा गोफणे, मा.कैलास बारणे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक २२) ह क्षेत्रीय कार्यालयातील आरोग्य विभागाअंतर्गत जड वाहन चालविण्यासाठी दोन अतिरिक्त वाहनचालक मिळणेबाबत-मा.आशा धायगुडे-शेंडगे, मा.माधुरी कुलकर्णी यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक २३) बॅडमिंटन हॉल भाडेतत्वावर देणेबाबत-मा.उषा मुंढे,मा.कोमल मेवानी यांचा प्रस्ताव...

-----------

अ) दिनांक ०४/१०/२०१७ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक २९) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

ब) दिनांक १०/१०/२०१७ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ३०) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

क) दिनांक १७/१०/२०१७ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ३१) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

-----------

ठराव क्रमांक –११८९ विषय क्रमांक – १

दिनांक – २५/१०/२०१७ विभाग– स्थापत्य मुख्यालय

सूचक – मा.कोमल मेवानी अनुमोदक – मा.माधुरी कुलकर्णी

संदर्भ – मा.शहर अभियंता यांचे जावक क्र.स्था/नि/२ब/कावि/१२९/१७ दि.१३/१०/२०१७

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

महापालिकेच्या स्थापत्य विभागाकडील 'ब' मुख्यालयाअंतर्गत सन २०१७-२०१८ चे अंदाजपत्रकातील ई-निविदा पध्दतीने करारनामा करुन कामाचे आदेश संबंधित ठेकेदाराला देण्यात आलेले आहेत. अशा निविदांचा तपशिल प्रस्तावासोबतचे प्रपत्र अ मधील (१ ते १२) मध्ये सादर करणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –११९० विषय क्रमांक – २
दिनांक – २५/१०/२०१७ विभाग– लेखा
सूचक – मा.लक्ष्मण उंडे अनुमोदक – मा.कैलास बारणे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.लेखा/६/कावि/९१८२/२०१७ दि.१६/१०/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०१७-१८ च्या अंदाजपत्रकातील फ क्षेत्रिय कार्यालय, स्थापत्य मुख्यालय कृष्णानगर प्रभाग क्र ४ मध्ये प्राधान्याने करावयाच्या कामांसाठी तरतुद अपुरी असल्याने प्रस्तावात नमुद प्रमाणे र.रू.२,५७,९३,०००/- (अक्षरी र.रू.दोन कोटी सत्तावन्न लाख त्र्यान्नव हजार फक्त) वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –११९१ विषय क्रमांक – ३
दिनांक – २५/१०/२०१७ विभाग– स्थापत्य क/ह मुख्यालय
सूचक – मा.उत्तम केंदळे अनुमोदक – मा.उषा मुंढे
संदर्भ – मा.शहर अभियंता यांचे जावक क्र.स्था/नि/क-मुख्य/कावि/३५१/१७ दि.१६/१०/२०१७

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभाग क, ह मुख्यालयाकडील प्रस्तावासोबतच्या प्रपत्र अ (१ ते 7) मधील कामांचे नियमानुसार व निविदा अटी शर्ती प्रमाणे तसेच भाववाढ कलम लागू असल्यास, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहिल या अटीस अधिन राहून संबंधित ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करुन कामाचे आदेश निर्गत केले असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –११९२ विषय क्रमांक – ४
दिनांक – २५/१०/२०१७ विभाग– स्थापत्य
सूचक – मा.माधुरी कुलकर्णी अनुमोदक – मा.निर्मला कुटे
संदर्भ – मा.शहर अभियंता यांचे जावक क्र.स्था/नि/३इ/कावि/२७६/१७ दि.१६/१०/२०१७

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.८/२२/१७-१८ भोसरी प्रभाग क्र. ३६ लांडेवाडी मधील भागात ट्रिमिक्स कॉक्रीट व पेव्हिंग ब्लॉक बसविणेकामी मे. साईप्रभा कन्स्ट्रक्शन नि.र.रु.२३,२७,२१८/- (अक्षरी र.रु. तेवीस लाख सत्तावीस हजार दोनशे अठरा फक्त) पेक्षा २२.२३% कमी या ठेकेदाराकडून निविदा मंजुर दराने र.रु.१८,०९,८७७/- पर्यंत काम करुन घेणेस कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –११९३ विषय क्रमांक – ५

दिनांक – २५/१०/२०१७ विभाग– स्थापत्य

सूचक – मा.कोमल मेवानी अनुमोदक – मा.आशा धायगुडे-शेंडगे

संदर्भ – मा.शहर अभियंता यांचे जावक क्र.स्था/नि/३इ/कावि/२७५/१७ दि.१६/१०/२०१७

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र. ८/४/१७-१८ भोसरी प्रभाग क्र.३३ गवळीनगर मधील भागात कलर ब्लॉक बसविणेकामी मे.साईप्रभा कन्स्ट्रक्शन नि.र.रु.२३,३३,१९०/- (अक्षरी र.रु.तेवीस लाख तेहतीस हजार एकशे नव्वद फक्त) पेक्षा २०.०७% कमी या ठेकेदाराकडून निविदा मंजुर दराने र.रु.१८,६४,९१९/- पर्यंत काम करुन घेणेस कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –११९४ विषय क्रमांक – ६

दिनांक – २५/१०/२०१७ विभाग– स्थापत्य

सूचक – मा.अनुराधा गोफणे अनुमोदक – मा.वैशाली काळभोर

संदर्भ – मा.शहर अभियंता यांचे जावक क्र.स्था/नि/३इ/कावि/२७४/१७ दि.१६/१०/२०१७

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.८/२०/१७-१८ भोसरी प्रभाग क्र.३६ लांडेवाडी मधील भागात गटर्सची स्थापत्य विषयक कामे करणेकामी मे.साईप्रभा कन्स्ट्रक्शन नि.र.रु.२३,१२,३६३/- (अक्षरी र.रु.तेवीस लाख बारा हजार तीनशे त्रेसष्ट फक्त) पेक्षा २२.२३% कमी या ठेकेदाराकडून निविदा मंजुर दराने र.रु.१७,९८,३२५/- पर्यंत काम करुन घेणेस कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –११९५ विषय क्रमांक – ७

दिनांक – २५/१०/२०१७ विभाग– स्थापत्य

सूचक – मा.कैलास बारणे अनुमोदक – मा.लक्ष्मण उंडे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/नि/३इ/कावि/२७३/१७ दि.१६/१०/२०१७

विषय -प्रभाग क्र.६ मोशी बो-हाडेवाडी येथील जुनी शाळा पाडून नविन शाळा इमारत बांधणेबाबत...

विषय क्रमांक ७चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –११९६ विषय क्रमांक – ८
दिनांक – २५/१०/२०१७ विभाग– स्थापत्य फ मुख्यालय
सूचक – मा.उत्तम केंदळे अनुमोदक – मा.उषा मुंढे
संदर्भ – मा.शहर अभियंता यांचे जावक क्र.स्था/नि/फ-मुख्य/कावि/५९/१७ दि.१६/१०/२०१७

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील प्रस्तावा सोबतच्या प्रपत्र अ (१ ते १५) मधील निविदा कामांचे अवलोकन होऊन नियमानुसार व निविदा अटीशर्ती प्रमाणे तसेच भाववाढ कलम लागू असल्यास, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहिल या अटीस अधिन राहून संबंधित ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करुन कामाचे आदेश निर्गत केले असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –११९७ विषय क्रमांक – ९
दिनांक – २५/१०/२०१७ विभाग– स्थापत्य ड मुख्यालय
सूचक – मा.माधुरी कुलकर्णी अनुमोदक – मा.निर्मला कुटे
संदर्भ – मा.शहर अभियंता यांचे जावक क्र.स्था/नि/ड-मुख्य/कावि/१९४/१७ दि.१६/१०/२०१७

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील प्रस्तावा सोबतच्या प्रपत्र अ (१ ते २१) मधील निविदा कामांचे अवलोकन होवुन नियमानुसार व निविदा अटीशर्ती प्रमाणे तसेच भाववाढ कलम लागू असल्यास, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहिल या अटीस अधिन राहून संबंधित ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करुन कामाचे आदेश निर्गत केले असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –११९८ विषय क्रमांक – १०
दिनांक – २५/१०/२०१७ विभाग– मध्यवर्ती भांडार
सूचक – मा.कोमल मेवानी अनुमोदक – मा.आशा धायगुडे-शेंडगे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मभां/५/कावि/११३६/२०१७ दि.१६/१०/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे विविध विभागांकडील संगणक यंत्रणेकरीता आवश्यक Antivirus Software कार्यान्वीत करणेकामी व सपोर्ट स्टाफ नियुक्त करणेकामी ऑनलाईन निविदा क्र.१०/२०१७-१८ अन्वये प्रसिध्द करून ऑनलाईन निविदा दर मागविणेत आले होते. त्यानुसार ऑनलाईन दर प्राप्त झाले आहेत. प्राप्त दरपत्रकामध्ये मे.झूम कॉम्पुटर्स यांचे बाब

क्र.०१ व ०२ साठी आवश्यक Antivirus Software खरेदीकामी व सपोर्ट स्टाफ नियुक्त करणेकामी दर एकुण र.रू.३०,२४,०००/-(अक्षरी र.रु.तीस लाख चोवीस हजार फक्त) लघुत्तमदर प्राप्त झाले आहेत.सदरचा खर्च हा अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा १८.९४% ने कमी असल्याने सदर येणा-या खर्चास व त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –११९९ विषय क्रमांक – ११

दिनांक – २५/१०/२०१७ विभाग– मध्यवर्ती भांडार

सूचक – मा.अनुराधा गोफणे अनुमोदक – मा.वैशाली काळभोर

संदर्भ – मा.सहा.आयुक्त यांचे जावक क्र.मभां/०४/कावि/६७७/२०१७ दि.१६/१०/२०१७

मा.सहा.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाचे औद्योगिक प्रशिक्षण संस्था मोरवाडी यांना आवश्यक खुर्च्या साहित्य मागणीनुसार खरेदी करणेकामी ई.नि.सु.क्र.14/2017-18 अन्वये प्रसिध्द करुन ऑनलाईन निविदा दर मागविणेत आले होते. प्राप्त लघुत्तम निविदाकार मे.रेखा इंजिनिअरींग वर्क्स, चिंचवड यांचे लघुत्तम दर प्रती नग र.रु.३०९६/- प्रमाणे ३५५ नग खुर्च्या खेरदीसाठी एकुण र.रु.१०,९९,०८०/- (अक्षरी र.रु. दहा लाख नव्यान्नव हजार ऐंशी फक्त) इतका खर्च येणार आहे. प्राप्त लघुत्तम दर स्विकृत करणेस मान्यता दिलेली असुन लघुत्तम निविदाकार यांचेबरोबर विहीत नमुन्यात करारनामा करून पुरवठा आदेश निर्गत करणेत आलेला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१२०० विषय क्रमांक – १२

दिनांक – २५/१०/२०१७ विभाग– लेखा

सूचक – मा.कैलास बारणे अनुमोदक – मा.लक्ष्मण उंडे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.लेखा/६/कावि/९१९३/२०१७ दि.१६/१०/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

क्षेत्रिय अधिकारी क क्षेत्रिय कार्यालय यांनी दि.०५/१०/२०१७ चे प्रस्तावान्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०१७-२०१८ च्या अंदाजपत्रकामध्ये क क्षेत्रिय कार्यालयाकडील विद्युत विषयक कामांना तरतूद कमी पडत असल्याने प्रस्तावात नमूद प्रमाणे रक्कम रुपये ९,८५,०००/- (अक्षरी र.रु.नऊ लाख पंच्याऐंशी हजार फक्त) तरतूदीचे विभागांतर्गत वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१२०१ विषय क्रमांक – १३
दिनांक – २५/१०/२०१७ विभाग– लेखा
सूचक – मा.उत्तम केंदळे अनुमोदक – मा.उषा मुंढे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.लेखा/६/कावि/९१९४/२०१७ दि.१६/१०/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

सह शहर अभियंता विद्युत (वि/यां) यांनी दि.२२/०९/२०१७ चे प्रस्तावान्वये विद्युत मुख्यलया अंतर्गत दूरसंचार विभागामार्फत गतवर्षी विविध कामासाठी निविदा मागविण्यात आलेल्या असून सदर कामाकरिता प्रस्तावात नमुद प्रमाणे विभागाअंतर्गत र.रु.१०,००,०००/- (अक्षरी र.रू.दहा लाख फक्त) वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१२०२ विषय क्रमांक – १४
दिनांक – २५/१०/२०१७ विभाग– अ क्षेत्रीय कार्यालय,आरोग्य
सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे अनुमोदक – मा.माधुरी कुलकर्णी
संदर्भ – मा.क्षेत्रीय अधिकारी यांचे जावक क्र.अ.क्षे.का./आ/२/कावि/६१०/२०१७ दि.१३/१०/२०१७

मा.क्षेत्रीय अधिकारी यांची शिफारस विचारात घेवून -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ क्षेत्रिय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील पिंपरी चिंचवड महानगरपालिका अ क्षेत्रीय कार्यालयामार्फत 50 नग तात्पुरत्या स्वरुपात पोर्टेबल टॉयलेट पुरविणेचे कामासाठी कोटेशन नोटीस क्र.२/२०१७-१८ अन्वये प्रसिध्द करुन दरपत्रक मागविण्यात आले होते. मे. बी.एस.एम. एंटरप्रायजेस यांनी दि. २५/०७/२०१७ रोजीचे दरपत्रक दिलेला दर र.रु.३०००/- (अक्षरी र.रू.तीन हजार फक्त) प्रत्येकी एक (१) शौचालय सिट हे दिलेले दर हे लघुत्तम दर आहे. त्यामुळे कोटेशन स्वीकृती दि.२६/०७/२०१७ चे अन्वये मे.बी.एस.एम. एंटरप्रायजेस दि.26/07/2017 च्या पत्रान्वये र.रू.३०००/- पेक्षा कमी करता येणार नाही असे पत्र दिले असून प्रस्तुत दराने प्रत्येकी एक (१) शौचालय सिट प्रमाणे एक महिन्याकरीता मान्य करणेत आलेला असून त्यांचेबरोबर करारनामा करुन कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेची मा.क्षेत्रीय अधिकारी यांची मागणी असली तरी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ क्षेत्रीय कार्यालयाकडे नागरीकांनी उघड्यावर शौचास जावू नये यासाठी शौचालयाची तात्पुरती व्यवस्था म्हणून भाडेतत्वावर ५० पोर्टेबल टॉयलेट कोटेशन नोटीस क्र.२/२०१७-१८ प्रसिद्ध करुन दर मागविणेत आले होते. त्यानुसार प्राप्त झालेल्या ३ दरपत्रकांपैकी मे.बी.एस.एम.एन्टरप्रायजेस यांनी सादर केलेला प्रति पोर्टेबल टॉयलेट प्रति महिना र.रु.३,०००/- दर सर्वांत कमी असलेने त्यांना दि.२९/०७/२०१७ ते २८/८/२०१७ या कालावधीत ५० पोर्टेबल टॉयलेट पुरविणेकामी आदेश देणेत आलेले आहेत. तथापी सदर शौचालयांची पुढील कालावधीसाठी आवश्यकता विचारात घेता विशेष बाब म्हणून मान्य दराने दिनांक २९/०८/२०१७ ते २८/९/२०१७ या कालावधीत ५० नग व २९/९/२०१७ ते

८/१०/२०१७ या कालावधीत २० नग पोर्टेबल टॉयलेट उपलब्ध करणेत आलेली असल्याने याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१२०३ विषय क्रमांक – १५
दिनांक – २५/१०/२०१७ विभाग– मुख्यलेखापरिक्षण
सूचक – मा.निर्मला कुटे अनुमोदक – मा.कोमल मेवानी
संदर्भ – मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे जावक क्र.मुलेप/६/कावि/१७८/२०१७ दि.१८/१०/२०१७

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५(१) अन्वये लेखापरिक्षण विभागाकडील माहे सप्टेंबर २०१७ अखेर संपणारा मासिक गोषवारा मा.मुख्यलेखा परिक्षक यांनी क्र.मुलेप/६/कावि/१७८/२०१७ दि. १८.१०.२०१७ अन्वये पाठविलेला अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१२०४ विषय क्रमांक – १६
दिनांक – २५/१०/२०१७ विभाग– मुख्यलेखापरिक्षण
सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे अनुमोदक – मा.अनुराधा गोफणे
संदर्भ – मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे जावक क्र.मुलेप/६/कावि/१८०/२०१७ दि.१८/१०/२०१७

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५(१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील ०२.१०.२०१७ ते दि.०८.१०.२०१७ अखेर संपणा-या आठवड्याचा मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी क्र.मुलेप/६/कावि/१८०/२०१७ दि.१८.१०.२०१७ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१२०५ विषय क्रमांक – १७
दिनांक – २५/१०/२०१७ विभाग– वाहन दुरुस्ती कार्यशाळा
सूचक – मा.वैशाली काळभोर अनुमोदक – मा.कैलास बारणे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.काशा/४/कावि/१००९/२०१७ दि.१८/१०/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यशाळा विभागाकडील वाहन दुरूस्ती कामाच्या ठेक्यातील वाढीव खर्चास ब गटा करिता निविदा नोटिस क्र.२/२०१५-१६ निविदा र.रू.५५,००,०००/-(प्रतिवर्षी) व क गट भाग १ करिता निविदा नोटिस क्र.३/२०१५-१६ क गट भाग २ करिता निविदा र.रू.३६,५०,०००/- (प्रतिवर्षी) या प्रमाणे निविदा प्रसिध्द करून ३ वर्षाकरिता दर प्राप्त करणेत आले होते त्यामध्ये ब गटाकरिता मे. शामराव गॅरेज यांचे निविदा रकमे पेक्षा २०.५२% कमी तर क गट भाग एक करिता मे. शामराव गॅरेज यांचे निविदा रकमे पेक्षा १८% कमी व क गट भाग २ करिता मे.श्री बालाजी गॅरेज यांचे निविदा रकमे पेक्षा ७%

कमी असे दर प्राप्त झाले होते. प्रस्तावात नमूद सर्व कारणांमुळे ठेक्याच्या कामाच्या प्रथम वर्षात निविदा मंजूर रकमेपेक्षा वाहनांच्या दुरूस्ती खर्चात ब गटामध्ये र.रू.४४,००,०००/- व क गट भाग १ मध्ये र.रू.२१,००,०००/- व क गट भाग २ मध्ये र.रू.१,०७,००,०००/- इतका वाढीव खर्च झालेला आहे तसेच ठेक्याच्या कामाच्या द्वितीय वर्षात ब गटामध्ये र.रू.४६,००,०००/- क गट भाग १ मध्ये र.रू.७६,००,०००/- व क गट भाग २ मध्ये र.रू.१,९०,००,०००/- इतका वाढीव खर्च झालेला आहे. सदरचा खर्च हा मंजूर निविदा दरानुसार झालेला असल्याने त्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**निर्णय-** १) सर्व विभागप्रमुख आणि मा.मुख्यलेखापाल यांना स्थायी समितीचे आदेश आहेत की, निविदा रकमेच्या मर्यादेपेक्षा जास्त खर्च झाला असल्यास तसेच निविदेची मुदत संपली असल्यास प्रत्यक्ष खर्चाच्या मान्यतेच्या नावाखाली सक्षम समितीच्या मान्यतेविना कोणत्याही बीलांची अदायगी करण्यात येऊ नये.

२) अशा प्रकारे असलेल्या सर्व कामांचे मान्यतेकामीचे प्रस्ताव १५ दिवसांत मा.स्थायी समितीपुढे मान्यतेसाठी सादर करण्यात यावेत.

३) यापुढे निविदा रकमेपेक्षा वाढीव खर्चाची बीले सक्षम समितीच्या मान्यतेविना परस्पर सादर/अदा केल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित विभागप्रमुखांविरुद्ध कठोर प्रशासकीय कारवाई करावी असे आदेश स्थायी समिती प्रशासनास देत आहे.

४) प्रस्तुत प्रकरणी बीलांची तपशिलवार छाननी/तपासणी केल्यानंतरच बीले अदा करण्यात यावीत.

----------

ठराव क्रमांक –१२०६ विषय क्रमांक – १८

दिनांक – २५/१०/२०१७ विभाग– स्थापत्य BSUP प्रकल्प

सूचक – मा.लक्ष्मण उंडे अनुमोदक – मा.उत्तम केंदळे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/BSUP प्र/४७६/२०१७ दि.१८/१०/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत चिखली से १७ व १९ येथे बांधणेत येत असलेल्या घरकुल या गृहप्रकल्पाचे सुधारित नकाशे पिं. चिं. नवनगर विकास प्राधिकरणाने दि.१९/०५/२०१७ रोजी मंजुर केलेले आहेत. सदर नकाशा मधील (१) टाऊनहॉल+लायब्ररी (२) हेल्थसेंटर (३) भाजी मंडई करिताचे सुविधा भुखंडावर इमारत बांधणेकामी मनपाचे मे.लॅंडमार्क डिजाईन ग्रुप यांची आर्किटेक्ट व प्रकल्प सल्लागार म्हणून नेमणूक केलेली आहे. त्यांनी सदर इमारतीचे नकाशे बांधकाम परवानगी करीता पिं.चिं. नवनगर विकास प्राधिकरण यांचेकडे सादर केलेले आहेत सदर इमारतीचे बांधकाम परवानगी करिता प्राधिकरणाने दि.१७/१०/२०१७ पत्रान्वये प्रस्तावात नमूद प्रमाणे शुल्क भरणे विषयी कळविलेले आहे. यातील १% बांधकाम उपकर रक्कम महानगरपालिके मार्फत शासनाकडे भरणेत येणार असल्याने इतर रक्कमा विकास शुल्क, बांधकाम सुरक्षा रक्कम व बांधकाम परवानगी शुल्क भरणे आवश्यक आहे

त्यांची एकत्रित रक्कम (२८,८६,०५०+२,३९,११०+२३,९१२) रुपये ३१,४९,०७२/-(अक्षरी र.रु. एकतीस लाख, एकोणपन्नास हजार बहात्तर फक्त) पिं.चिं.नवनगर विकास प्राधिकरण यांना अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**निर्णय- <u>काळेवाडीमधील रस्त्याचे कामाबाबत -</u>**

१) काळेवाडीमधील राजवाडेनगरमधील १८ मी. रस्त्याचे काम न करता बील अदा केले गेले आहे, अशी बातमी वर्तमानपत्रांमध्ये आली होती. यासंदर्भात कोणत्याही सक्षम समितीची मान्यता न घेता, संबंधित नगरसेवकांचे लेखी पत्र न घेता रु.५० लाखांचे रस्त्यांचे कामकाज केले गेले असल्याचे स्पष्ट झाले आहे. कार्य.अभियंता श्री.ओंभासे यांनी प्रेस मिटींग घेऊन आपले म्हणणे व्यवस्थितरित्या मांडून रितसर खुलासा करावा.

२) मा.शहर अभियंता श्री.चव्हाण, यांनी या रस्त्यांवर या दोन वर्षांत परत कुठे डांबरीकरण झाले नाही ना, परत कुठे पैसे खर्च केले गेले नाहीत ना याची खात्री करुन घ्यावी.

----------

**<u>यानंतर सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले ऐनवेळचे विषय घेणेत आले –</u>**

ठराव क्रमांक –१२०७ — विषय क्रमांक – १९

दिनांक – २५/१०/२०१७ — विभाग– झोनिपु स्थापत्य

सूचक – मा.उषा मुंढे — अनुमोदक – मा.माधुरी कुलकर्णी

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.झोनिपु/स्था/कावि/६४४/२०१७ दि.२३/१०/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी भाटनगर पुनर्वसन प्रकल्पातील १७ इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडीट न करता प्रातिनिधिक स्वरुपात कोणत्याही २ जीर्ण इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडीट केल्यास संपुर्ण प्रकल्पातील इतर इमारतींची स्ट्रक्चरल संरक्षणात्मक परिक्षण लक्षात येईल व उर्वरित इमारतींची स्थिती आणि त्यावरील करण्याच्या उपाय योजनांबाबत पुढील धोरणात्मक निर्णय घेता येईल. तद्अनुषंगाने या दोन इमारतींचे उपरोक्त काम करणेकरीता मे.के.बी.पी.सिव्हिल इंजिनिअरिंग सर्व्हिसेस यांची नेमणूक करुन त्यांना अदा करावयाच्या फी पोटी म.न.पा.च्या प्रचलित दरसुचीनुसार र.रु.३,४८,१४४/-(अक्षरी र.रु.तीन लाख अठ्ठेचाळीस हजार एकशे चव्वेचाळीस फक्त) व त्यावरील टॅक्स (GST) चे खर्चास तसेच सदर कामाकरीता करारनामा करुन त्यांना कामाचा आदेश देण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१२०८ विषय क्रमांक – २०

दिनांक – २५/१०/२०१७

सूचक – मा.उषा मुंढे अनुमोदक – मा.अनुराधा गोफणे

संदर्भ – मा.उषा मुंढे, मा.अनुराधा गोफणे यांचा प्रस्ताव...

दि.०९/१०/२०१७ रोजी भिमसृष्टी प्रकल्पाबाबत झालेल्या बैठकीत माता रमाईचा पुतळा डॉ.बाबासाहेब आंबेरकर पुतळा परीसरात उभारणे बाबत निर्णय घेण्यात आला आहे. त्याप्रमाणे सदर कामाचे नावही सन २०१७/२०१८ चे अंदाजपत्रकात महापालिका सभा ठराव क्र.९७ दि.१६/१०/२०१७ अन्वये समाविष्ट करणेत आलेले आहे. सदर कामाचे अंदाजपत्रक, नकाशे इ. तयार करणेसाठी वास्तुविशारदाची नेमणूक करणे आवश्यक आहे. म.न.पा. पॅनलवरील वास्तुविशारद श्री.गिरीष चिद्दवार, सृष्टी डिजाईनर हे सदर काम करण्यास तयार आहेत. तरी त्याची विषयांकीत कामास वास्तुविशारद म्हणून नेमणूक करणेस तसेच म.न.पा. दरानुसार म्हणजेच र.रु.५०/- लक्ष पर्यंतचे कामास ३% फी व र.रु.५० लक्षचे पुढील कामास २% फी त्यांना अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१२०९ विषय क्रमांक – २१

दिनांक – २५/१०/२०१७

सूचक – मा.अनुराधा गोफणे अनुमोदक – मा.कैलास बारणे

संदर्भ – मा.अनुराधा गोफणे, मा.कैलास बारणे यांचा प्रस्ताव...

प्रभाग क्र.१६, मौजे रावेत येथील औंध रावेत रस्त्याजवळील सेलेस्टीयल सिटीपासून रावेत स.नं.१५४ येथील रेल्वे उड्डाणपुलापर्यंतचा विकास आराखड्यातील २४.०० मी. रुंदीचा रस्ता विकसीत करणेकामी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून मे.इन्फ्राकिंग कन्सल्टिंग इंजिनिअर्स प्रा.लि. यांची मनपाचे प्रचलित दरानुसार नेमणूक करणेचा विषय क्र.६० ठराव क्र.१०७८ दि.२७/०९/२०१७ रोजी मंजूर झालेला आहे. सदर ठरावात मे.इन्फ्राकिंग कन्सल्टिंग इंजिनिअर्स प्रा.लि. यांची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून मनपाचे प्रचलित दरानुसार निविदापूर्व व निविदा पश्चात काम करणेसाठी प्रकल्प किंमतीच्या २.३५% + सर्व्हिस टॅक्स (निविदा पूर्व-०.९०% व निविदा पश्चात १.३५%) अशी फी अदा करणेस मान्यता दिलेली आहे. तथापि सदर दर (निविदा पूर्व-०.९०% व निविदा पश्चात १.४५% = २.३५%) असा असणे आवश्यक आहे. याप्रमाणे दुरुस्तीसह ठरावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – १२१०                                                विषय क्रमांक – २२

दिनांक – २५/१०/२०१७

सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे                                        अनुमोदक – मा.माधुरी कुलकर्णी

संदर्भ – मा.आशा धायगुडे-शेंडगे, मा.माधुरी कुलकर्णी यांचा प्रस्ताव...

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आरोग्य विभागामार्फत दि.२४/०७/२०१५ पासुन श्री.संत गाडगेबाबा महाराज बेरोजगार संस्था यांचेमार्फत जुने वॉर्ड क्र.५८,५९,६० (नवीन प्रभाग क्र.३१,३२) मध्ये टाटा ए.सी. वाहनांद्वारे घरोघरचा कचरा गोळा करणेसाठी मनुष्यबळ पुरविणेचे कामाचा आदेश देणेत आलेला आहे. सद्यस्थितीत सदर संस्थेचे १४ वाहन चालक व २८ कर्मचारी दैनंदिन कचरा गोळा करणेचे कामकाज करीत आहेत. तथापि ह क्षेत्रिय कार्यालय यांचेकडे ४ कॉम्पॅक्टर असून मनपाचे २ वाहन चालक त्यावर कार्यरत असून २ वाहन चालकांची कमतरता जाणवत आहे. तरी श्री.संत गाडगेबाबा महाराज बेरोजगार संस्था यांना मनुष्यबळ पुरविण्याचे आदेश असल्याने व वरील संस्था ह क्षेत्रीय कार्यालयांतर्गत काम करीत असल्याने त्यांना २ अतिरिक्त वाहन चालक पुरविण्यास अथवा त्यांच्याकडून उपलब्ध न झाल्यास मानधनावर घेण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – १२११                                                विषय क्रमांक – २३

दिनांक – २५/१०/२०१७

सूचक – मा.उषा मुंढे                                                अनुमोदक – मा.कोमल मेवानी

संदर्भ – मा.उषा मुंढे,मा.कोमल मेवानी यांचा प्रस्ताव...

प्रभाग क्र.३१ येथील कै.काळुराम मारुती जगताप बॅडमिंटन हॉल, पिंपळे गुरव, पुणे-६१ हा युवा विकास ट्रस्ट, पिंपळे गुरव यांना दरमहा र.रु.१९,८००/- या भाडे दराने ५ वर्षासाठी, प्रती वर्षी १०% भाडेवाढ करुन भाडेतत्वावर देण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(सिमा रविंद्र सावळे)**
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव विभाग,
क्रमांक - नस/१०/कावि/८०/२०१७
दिनांक - ०२/११/२०१७



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.